**कृपया प्रसिध्दीसाठी -** **24 जानेवारी 2009**

## अडीच लाख मतदार दुबार असल्याची
## निवडणूक आयोगाची कबुली

**मुंबई, शनिवार :** माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांच्या तक्रारीनुसार पाहाणी केल्यानंतर 2,57,193 मतदारांची नावे दुबार असल्याचे आढळून आले आहे, अशी माहिती महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री.देबाशिष चक्रवर्ती यांनी दिली आहे. श्री.नाईक यांना एका पत्राद्वारे ही माहिती देण्यात आल्याचे प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

या संदर्भात अधिक माहिती देताना श्री.राम नाईक म्हणाले, "गेल्या लोकसभा निवडणूक निकालांचे विश्लेषण करताना मोठ्या प्रमाणावर बोगस मतदान झाले त्याचे कारण अनेक मतदार दुबार आहेत हे आमच्या लक्षात आले. मुंबई उपनगर जिल्ह्यातील जुन्या मालाड, कांदिवली व बोरीवली विधानसभा क्षेत्रातच 3,57,520 मतदार दुबार असल्याचे बारकाईने पाहाणी केल्यानंतर आढळून आले होते. या सर्व दुबार मतदारांची यादीच एप्रिल 2008 मध्ये मी निवडणूक आयोगाला दिली होती. त्यानंतर त्यांच्या सूचनेवरुन प्रत्यक्ष तपासणी व कारवाईसाठी 3,57,520 दुबार मतदारांची यादी मी महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री.देबाशिष चक्रवर्ती यांना दिली होती. यादी तपासून निर्दोष मतदार यादी प्रसिध्द व्हावी यासाठी गेले काही महिने सतत पाठपुरावाही करीत होतो."

आता अंतिम मतदार यादी प्रसिध्द करीत असतानाच मुख्य निवडणूक अधिका-यांनी पाहाणीत दुबार मतदार आढळल्याचे मान्य करुन 2,57,193 दुबार मतदारांना नोटीस बजावत असल्याचे श्री.राम नाईक यांना कळविले आहे. सर्व मतदारांची नावे संगणक आज्ञावली (Software application) द्वारे शोधण्यात आली असून प्रथम दर्शनी आढळलेल्या या अडीच लाख दुबार मतदारांना लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1951 च्या कलम 17 व 18 खाली नोटीसा देण्यात येत असून ही संपूर्ण प्रक्रिया 28 फेब्रुवारी 2009 पूर्वी पूर्ण करण्याचे आदेश मतदार नोंदणी अधिका-यांना देण्यात आले आहेत असेही मुख्य निवडणूक अधिका-यांनी श्री.राम नाईक यांना कळविले आहे.

दुबार मतदारांच्या आम्ही दिलेल्या संपूर्ण यादीची घरोघर जाऊन प्रत्यक्ष पाहाणी करण्यात यावी. संगणक आज्ञावली हा एकमेव निकष लावू नये अशी मागणी यावेळी श्री.नाईक यांनी केली आहे. "केवळ संगणकाद्वारे नावे शोधल्यास नावांतील, मतदारांच्या वयाच्या नोंदीतील किरकोळ फरकांमुळे अनेक दुबार नावे लक्षात न येऊन निर्दोष मतदार यादी होऊ शकणार नाही. घरोघर जाऊनच हे काम केले पाहिजे," असेही श्री.नाईक यांनी पत्रकाच्या अखेरीस म्हटले आहे.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न : मुख्य निवडणूक अधिका-यांचे 21 जानेवारीचे पत्र.**